लोकसत्ता
रविवार वृत्तान्त ठाणे, नवी मुंबई; रविवार, १३ ऑक्टोबर २०१३

# निळ्याशार समुद्राची अथांगता

# माऊंटन रेंज सी विंड्स

**कोकण! कोकण** म्हटलं की डोळ्यासमोर येतो निळ्याशार समुद्र आणि गरमागरम खमंग कोकणी स्वादिष्ट जेवण. कोकण म्हटलं की आठवतात स्वच्छ, सुंदर, स्फटिकरूपी, मऊशार वाळू असलेले समुद्रकिनारे.

कोकण म्हणजे जणू एक सुंदर, हिरवीगार स्वप्ननगरी. त्यात लाल मातीचे रस्ते, नारळी-पोफळीच्या बागा, नदी-नाले आणि निळाशार समुद्राची अथांगता. जणू एखाद्या चित्रकाराने जीव ओतून रंगविलेले सुंदर चित्र म्हणजे कोकण आणि अशा अनेक सुंदर चित्रांपैकी एक म्हणजे 'गुहागर'. कोकणात 'गुहागर' हे ठिकाण तर 'मानाचा तुरा' आहे.

मुंबई-पुण्यापासून अगदी ४ ते ५ तासांच्या अंतरावर असलेल्या गुहागरची 'पवित्र मंदिरांचे वास्तव्याचे ठिकाण' अशी ख्याती आहे. व्याडेश्वर, वेळणेश्वर, बालेकश्वर, चंडिका मंदिर अशी प्रसिद्ध मंदिरे येथे आहेत. त्याचप्रमाणे 'गोपालगड'सारख्या ऐतिहासिक वास्तूदेखील येथे आपल्या ऐतिहासिक संस्कृतीचे जतन करत आहेत. 'वशिष्ठी' नदीदेखील एक वैशिष्ट्य आहे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे 'गुहागर बीच'.

पर्यटक गुहागरमध्ये येतात ते 'गुहागर बीच'च्या लोकप्रियतेमुळे. येथील समुद्रकिनारा हा पर्यटकांना भुरळ घालतो. नैसर्गिक सौंदर्यता लाभल्यामुळे 'गुहागर' हे एक उत्तम टूरिस्ट स्पॉट बनले आहे. कित्येक देशी-विदेशी पर्यटक येथे भेट देत असतात. परंतु अशा पर्यटकांच्या राहण्याच्या व खाण्या-पिण्याच्या सोयीसाठी खास अशी काही व्यवस्था गुहागरमध्ये नाही.

आणि म्हणूनच ठाण्यातील 'माऊंटन रेंज' कंपनीने 'सी विंडस्' हे हॉटेल उभारून अशा पर्यटकांची गैरसोय दूर केली आहे. सी विंडस् हॉटेल हे 'थ्री स्टार' दर्जाचे हॉटेल असून ते अगदी समुद्रकिनाऱ्यासमोर आहे. माऊंटन रेंजची प्रसिद्धी अशी आहे की 'ग्राहकांच्या खिशाला परवडणारे परंतु दर्जेदार सुविधा पुरविणारे प्रोजेक्टस उभारून ते पूर्णत्वास नेणे. उद्योगक्षेत्रात गेली एक दशक माऊंटन रेंज खंबीरपणे पाय रोवून उभी आहे. कोलंबो युनिर्व्हसिटीने डॉक्टरेट पदवीने विभूषित केलेले व वेगवेगळ्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी सन्मानित केलेले 'डॉ. जितेंद्र खेर' हे या कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत.

आत्ताच संपन्न झालेल्या ठाणे महानगरपालिकेच्या वर्धापन दिनानिमित्त



झालेल्या सत्कार समारंभ सोहळ्यात नामांकित व्यक्तींना दिल्या जाणाऱ्या पुरस्कारांपैकी एक म्हणजे 'ठाणे गौरव पुरस्कार' डॉ. खेर यांना ठाणे महापौरांनी प्रदान करून गौरविले आहे. डॉ. खेर यांच्या कल्पक व्यक्तिमत्त्वातून नाविन्यपूर्ण उपक्रम उदयास येतात व ते यशस्वीपणे यशाची घौडदौड करतात. त्याचेच एक उदाहरण म्हणजे 'वाईल्ड कॅम्प नेचर रिसॉर्ट'. हे रिसॉर्ट गेली एक दशक ग्राहकांच्या पसंतील उतरत आहे व त्याची पोचपावती म्हणजे या रिसॉर्टला मिळालेला 'इंडियन हॉस्पिटालिटी अॅण्ड टूरिझम अॅवॉर्ड'. डॉ. खेर यांनी स्वतःला एका ग्राहकाच्या जागी ठेवून प्रत्येक प्रोजेक्ट उभारला असल्याने ग्राहकांच्या पसंतीला प्रत्येक प्रोजेक्ट नक्की उतरतो.

त्यातीलच एक म्हणजे 'गुहागर- सी विंडस्'. काही लोक म्हणतात की नावात काय आहे? पण इथे तर सर्व नावातच आहे. समुद्र किनाऱ्यासमोर असलेले 'सी विंडस्' हे हॉटेल गुहागरची शोभा अधिकच वाढवत आहे. समुद्री वारा, शांततेत येणारा लाटांचा धीरगंभीर आवाज. हे सर्व सी विंडस्मध्ये अनुभवायला मिळेल. गार्डन रेस्टॉरंट, ए. सी. रेस्टॉरंट, ए. सी. व नॉन ए.सी. रूम्स या सर्वांचा अनुभव व तोसुद्धा समुद्रकिनाऱ्यासमोर अनुभवायला मिळेल. सुपेरियर रूम्स, कपल्ससाठी खास एकांतातील पर्सनल गार्डन रूम्स, लक्झरियस अशा स्वीट रूम्स या हॉटेलमध्ये उपलब्ध आहेत.कम्फर्ट लेव्हलपासून ते लक्झरियस लेव्हलपर्यंतचा एक वेगळा खास दर्जा हॉटेलने निर्माण केला आहे. उत्तम दर्जाचे 'सी फूड', शाकाहारी, मांसाहारी जेवण तसेच पंजाबपासून ते साऊथ इंडियन पद्धतीच्या वेगवेगळ्या डिशेस व त्याबरोबर लज्जतदार मालवणी तडका याचाही आस्वाद घेता येईल. 'सी विंडस् (समुद्री वारे) या समुद्रालगतच्या, समुद्रासोबतच्या हॉटेलमधला फॅमिलीसोबतचा किंवा मित्रपरिवारासोबतचा 'स्टे' नक्की अविस्मरणीय राहील. हॉटेललगतचा परिसरसुद्धा नयनरम्य, डोळ्याचे पारणे फिटण्याजोगा आहे. वॉटर बोटिंग व वॉटर स्पोर्टसारख्या अॅडव्हेंचर अॅक्टिव्हिटीज येथे जवळपास उपलब्ध आहेत. अशाप्रकारे ऐतिहासिक, सांस्कृतिक, धार्मिक, नैसर्गिक अशा विविधतेने नटलेल्या व विविध छटा असलेल्या गुहागरमध्ये हॉटेल

**अधिक माहितीसाठी संपर्क-**
दूरध्वनी-
०२२-२५३०६३४०/२५४५१२३४/
२५३०६२६३/२५३९१७७७
वेबसाईट- www.seawinds.in